दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.३ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १३० • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 3 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 130 • Pages 4 • Rate 4 Rs




# लाडक्या बहिणींना वर्षाअखेरीचा दिलासा,खात्यात आले १५०० रुपये

## तीन महिन्यांची प्रतीक्षा, पण हाती पडला एकच हफ्ता; अपेक्षांवर पाणी

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यातील लोकप्रिय आणि बहुचर्चित मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभार्थी महिलांसाठी वर्षाच्या अखेरीस मोठी घडामोड समोर आली आहे. पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये नोव्हेंबर महिन्याचा हफ्ता जमा करण्यात आला असून, बुधवारी सायंकाळी अनेक महिलांच्या खात्यांत १५०० रुपयांची रक्कम जमा झाली. या योजनेअंतर्गत नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन्ही महिन्यांचे हफ्ते प्रलंबित होते. त्यामुळे वर्षअखेर एकत्रित रक्कम मिळेल, अशी आशा लाभार्थ्यांमध्ये होती.मात्र प्रत्यक्षात नोव्हेंबर महिन्याचाच एक हफ्ता जमा झाल्याने अनेक महिलांचा अपेक्षाभंग झाला आहे. याआधी नोव्हेंबर आणि डिसेंबरचे मिळून ३००० रुपये मिळतील, अशी चर्चा होती. त्यातच जानेवारी महिन्याचाही हफ्ता एकत्र दिला जाईल आणि ४५०० रुपये खात्यात जमा होतील, असा अंदाज बांधला जात होता. मात्र प्रत्यक्षात केवळ १५०० रुपये जमा झाल्याने महिलांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. वर्षाच्या शेवटी महागाईचा भार वाढलेला असताना आणि घरगुती खर्च डोईजड झालेला असताना, अपेक्षेपेक्षा कमी रक्कम मिळाल्याने काही लाडक्या बहिणी नाराज झाल्याचे चित्र आहे. विशेषतः डिसेंबर महिना पूर्ण संपत असताना फक्त नोव्हेंबरचे पैसे मिळाल्याने सरकारकडून उर्वरित हफ्त्यांबाबत स्पष्टता कधी येणार, असा प्रश्न महिलांकडून उपस्थित केला जात आहे. तरीही, किमान नोव्हेंबरचा हफ्ता खात्यात आल्याने अनेक महिलांनी समाधान व्यक्त केले आहे.दरम्यान, लाडकी बहीण योजनेतील ई-केवायसी हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. योजनेसाठी ई-केवायसी करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर होती. ज्या महिलांनी मुदतीत ई-केवायसी पूर्ण केली नाही, त्यांचा योजनेचा लाभ बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधार कार्ड बँक खात्याशी लिंक नसणे, किंवा ई-केवायसी अपूर्ण असणे, या कारणांमुळे अनेक महिलांना 'अपात्र' ठरवले जाऊ शकते. त्यामुळे नवीन वर्ष २०२६ पासून अशा महिलांच्या खात्यात १५०० रुपयांचा हफ्ता कायमचा बंद होण्याचा धोका आहे.याच पार्श्वभूमीवर, अनेक महिलांना खात्यात पैसे जमा झाल्याचा एसएमएस अद्याप न मिळाल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. मात्र तांत्रिक अडचणी, बँक सर्व्हर डाऊन असणे किंवा नेटवर्क समस्यांमुळे अनेकदा संदेश उशिरा येतो किंवा येतच नाही. त्यामुळे एसएमएस आला नाही म्हणून घाबरून जाण्याची गरज नसल्याचे तज्ज्ञ सांगतात. महिलांनी बँक पासबुक अपडेट करून, मोबाईल बँकिंग किंवा यूपीआय ॲपद्वारे, एटीएममधील मिनी स्टेटमेंट तपासून खात्यात रक्कम जमा झाली आहे का, हे पाहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान वारंवार बदलणाऱ्या तारखा, केवायसीची कडक अट आणि हफ्त्यांबाबत असलेला संभ्रम यामुळे लाभार्थी महिलांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. एकीकडे योजना महिलांसाठी आर्थिक आधार ठरत असली, तरी दुसरीकडे नियमांचे पालन न झाल्यास लाभ बंद होण्याची भीतीही महिलांना सतावत आहे. त्यामुळे शासनाकडून याबाबत स्पष्ट आणि सुसंगत माहिती दिली जावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### डिसेंबर, जानेवारी महिन्यांच्या हफ्त्यांबाबत अनिश्चितता कायम

**एकूणच, वर्षाच्या सरतेशेवटी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मिळालेला नोव्हेंबर महिन्याचा हफ्ता हा काही अंशी दिलासादायक असला, तरी डिसेंबर आणि जानेवारी महिन्यांच्या हफ्त्यांबाबत अद्याप अनिश्चितता कायम आहे. ई-केवायसी न केलेल्या महिलांसाठी ही योजना बंद होणार का, यावर पुढील निर्णय काय होतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. शासनाकडून पुढील हफ्त्यांबाबत आणि मुदतवाढीबाबत स्पष्ट घोषणा झाल्यासच लाखो लाडक्या बहिणींचा संभ्रम दूर होणार आहे.**

# आंतरजातीय लग्न केलेल्या मुलीच्या आई वडिलांची जावयाच्या आई-वडीलांना मारहाण

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**



आंतर जातीय लग्न केलेल्या मुलीच्या आई-वडिलांनी जावयाच्या आई-वडीलांना मारहाण करून जखमी केले आहे.

केज तालुक्यातील वाघेबाभळगाव येथील शिवाजी वाघ यांचा मुलगा शरद वाघ याने विलास ठोंबरे यांची मुलगी वैष्णवी हिच्या सोबत मागील तीन वर्षा पूर्वी आंतरजातीय विवाह केलेला आहे. वैष्णवी व शरद वाघ हे दोघे बीड येथे राहतात.

दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ९:०० च्या सुमारास विजया वाघ व शिवाजी वाघ हे दोघे पती-पत्नी त्यांच्या गावातील बाळु शेलार यांचे शेतात कांद्याचे रोप आणण्यासाठी जात होते. त्याच रस्त्याने जात असलेले त्यांच्या सुन वैष्णवी हिचे वडील विलास यादवराव ठोंबरे व आई जयमाला विलास ठोंबरे व दोघे अनोळखी त्यांना पाहुन त्यांच्या जवळ गेले. विजया व शिवाजी वाघ हे कांद्याचे रोप उपटत असतांना विलास ठोंबरे याने त्यांना शिवीगाळ करून त्याने लोखंडी गज विजया वाघ यांच्या डोक्यात मारून दुखापत केली. तर जयमाला ठोंबरे हिने विळ्याने मारहाण करून गळ्यातील सोन्याची पोत तोडली. शिवाजी वाघ हे भांडण सोडविण्यासाठी आले असता त्यांच्या सोबतच्या दोन इसमांनी त्यांना काठीने मारून गंभीर जखमी केले.

त्या नंतर जखमींवर प्राथमिक आरोग्य केंद्र नांदुरघाट येथे प्रथमोपचार करून जिल्हा रुग्णालय बीड येथे संदर्भ सेवेसाठी हलविले. तिथून पुढे त्यांना बीड येथे लाईफलाईन हॉस्पीटल मध्ये अतिदक्षता विभागात दाखल केले.त्या नंतर विजया वाघ यांच्या तक्रारी वरून

त्यांची सून वैष्णवी हिचे आई-वडील जयमाला ठोंबरे, विलास ठोंबरे आणि दोन अनोळखी व्यक्ती या चौघा विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ०५/२०२६ भा. न्या. सं. ११५(२), ११८(२), ३५१(२), ३५२, ३(५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर हे या प्रकरणी तपास करीत आहेत.विजया वाघ यांचा डावा हात आणि करंगळीला फ्रॅक्चर झाले आहे तर शिवाजी वाघ यांना मुकामार लागल्याने त्यांच्यावर बीड येथे उपचार सुरू आहेत.

# नंदुरबार जिल्ह्याच्या शाश्वत विकासाला गती

## जिल्हाधिकाऱ्यांकडून दोन अत्याधुनिक प्रयोगशाळांची पाहणी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



जिल्हा वार्षिक विकास आराखड्यांतर्गत उभारण्यात आलेल्या प्रकल्पांमुळे जिल्ह्याच्या कृषी आणि आरोग्य क्षेत्रात मोठी क्रांती होणार आहे. याच पार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिनांक १ जानेवारी रोजी जिल्ह्यातील 'व्हिजन' माती व पाणी परीक्षण आणि 'अन्नवेध' अन्न तपासणी या दोन महत्त्वपूर्ण प्रयोगशाळांची सविस्तर पाहणी केली. या सुविधांमुळे शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीसाठी आणि नागरिकांना शुद्ध अन्नासाठी आता जिल्ह्याबाहेर जाण्याची गरज भासणार नाही.

नंदुरबार येथील 'व्हिजन' प्रयोगशाळेत (सन २०२४-२५) जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी मातीतील १२ महत्त्वाच्या घटकांच्या तपासणी प्रक्रियेची माहिती घेतली.यामुळे होणारा फायदा म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीतील अन्नद्रव्यांची अचूक माहिती मिळेल. याचा परिणाम म्हणजे खतांचा संतुलित वापर होऊन उत्पादन खर्च कमी होईल आणि जमिनीचा पोत सुधारेल.

अन्नसुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी सन २०२५-२६ मध्ये उभारण्यात आलेल्या 'अन्नवेध' प्रयोगशाळेचीही पाहणी करण्यात आली. जिल्ह्यातच ही सुविधा उपलब्ध झाल्याने अन्न नमुन्यांची तपासणी आता अधिक सुलभ, जलद आणि प्रभावी होणार आहे. यामुळे भेसळ रोखण्यास मोठी मदत होणार असून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण होईल. दोन्ही प्रयोगशाळांमधील अत्याधुनिक उपकरणे आणि तांत्रिक कार्यपद्धती पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, यापूर्वी माती आणि अन्न परीक्षणासाठी जिल्ह्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता, मात्र आता या सुविधांमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या पाहणी दौऱ्यात कृषी उपसंचालक तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तानाजी खर्डे, उपविभागीय कृषी अधिकारी सी. के. ठाकरे, प्रभारी तालुका कृषी अधिकारी व्ही. एस. वळवी, मंडळ कृषी अधिकारी कुणाल ठाकूर आणि उप कृषी अधिकारी सतीश गिरासे उपस्थित होते.

## वादळी कट्टा

### नैवेद्यापलीकडचा देव

पहिल्यासारखा देवही आता वागत नाही
त्याच्याही अगरबत्ती-नारळावर भागत नाही

आपण कितीही रचावे त्याच्या समोर
शब्दांचे उंच मनोरे..
तो काही केल्या शब्दाला जागत नाही

आपण केलेल्या नवसाच्या
नैवेद्यालाही
तो ढुंकूनसुद्धा बघत नाही

कसं कळावं देवाच्या मनातलं?
तोही कधी आपल्याकडे
काहीच मागत नाही

माणसाचा अहंकार सोडून,
नम्रतेशिवाय
त्याला दुसरं काही लागत नाही

:: कवी ::
विलास पोवळे



# बळीराजा मृत्यूच्या छायेत! थंडीचा कडाका आणि बिबट्याच्या दहशतीत रात्रीची वीज कशासाठी?

## शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी दिवसा वीज द्या; भारतीय किसान संघाचा तळोदा तहसीलदारांना इशारा

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**




**शेतकऱ्यांचा जीव मोलाचा आहे. बिबट्याच्या हल्ल्याची दाट शक्यता असल्याने प्रशासनाने सुरक्षेचा विचार करून रात्रीचा वीजपुरवठा रद्द करावा आणि दिवसा अखंडित वीज द्यावी. - भारतीय किसान संघ, तळोदा**

नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यात सध्या निसर्ग आणि प्रशासन अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. एकीकडे हाडं गोठवणारी थंडी आणि दुसरीकडे शिवारात वाढलेला बिबट्याचा वावर असताना, महावितरणने रात्री ८:३० ते पहाटे ४:३० अशी वीजपुरवठ्याची वेळ लादली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून, शेतकऱ्यांचा जीव स्वस्त झालाय का? असा सवाल करत भारतीय किसान संघाने दिनांक १ रोजी तहसीलदारांना धडक निवेदन दिले. दिलेल्या निवेदनात शेतकऱ्याच्या मागण्या आहेत त्या म्हणजे रात्रीच्या अंधारात बिबट्याशी आमनासामना होण्याचे प्रमाण वाढले आहे. शेतकऱ्यांचा जीव वाचवण्यासाठी कृषी पंपांचे वेळापत्रक बदलून ते दिवसा करणे तातडीची गरज आहे.रात्रीच्या वेळी थंडी आणि जंगली प्राण्यांच्या भीतीमुळे मजूर कामावर येण्यास तयार नाहीत. याचा थेट परिणाम रब्बी हंगामातील गहू, हरभरा आणि ऊस या पिकांच्या सिंचनावर होत आहे. वेळीच पाणी न मिळाल्यास पिके सुकून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होणार आहे. हे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने वीज धोरणात लवचिकता आणावी. कडाक्याच्या थंडीत रात्री शेतात काम केल्यामुळे शेतकऱ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत.

सध्या रब्बी हंगाम निर्णायक टप्प्यात आहे. पिकांना सिंचनाची नितांत गरज असताना महावितरणचे हे धोरण शेतकरीविरोधी असल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. जर प्रशासनाने वेळीच दखल घेतली नाही आणि कोणतीही अघटित घटना घडली, तर त्याला पूर्णतः महावितरण जबाबदार राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

हे निवेदन देताना भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष सुपड्या ठाकरे, तालुका अध्यक्ष छोटू कलाल, तालुका कार्याध्यक्ष अशोक पाटील (आमलाड), उपाध्यक्ष नितीन पाटील, तालुका मंत्री शिरीष मगरे, जिल्हा पालक विजयराव सोनवणे उपस्थित होते.

तसेच अर्जुन पाटील (धानोरा), प्रताप गिरासे (प्रतापूर), अतुल पाटील (मोडवड), शांतीलाल पिंपरे (तळोदा), अर्जुन पाटील (मोड), मोहन रघुवंशी, मुकेश जैन, राजेश चौधरी, अनिल नाईक, सतीश सोलंकी, संजय मोरे, मनोज पाटील, योगेश कोळी, तुळशीराम पाटील यांसह तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## मुक्तिदात्या क्रांतीज्योती सावित्री



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या केवळ पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर स्त्री शिक्षणाच्या क्रांतीच्या जननी होत्या. समाजाच्या तीव्र विरोधाला सामोरे जात त्यांनी महिलांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले केले आणि 'चूल-मूल'च्या बंधनातून स्त्रीला मुक्त केले. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने आजच्या महिला प्रगतीचा पाया घातला. सावित्रीबाई फुले यांची जयंती म्हणजे स्त्री शिक्षण, समता आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणांचा जागर.शिक्षणाशिवाय स्त्री ही मुळे किंवा पाने नसलेल्या वडाच्या झाडासारखी आहेत, ती तिच्या मुलांचे पालनपोषण करू शकत नाही आणि स्वतः जिवंत राहू शकत नाही. तसेच शिक्षण हे तुमचे मन उघडण्याची गुरुकिल्ली आहे आणि ते तुम्हाला तुमच्या आयुष्यात काहीतरी करण्यास सक्षम करते असे सांगणाऱ्या आपल्या देशातील पहिल्या महिला शिक्षिका, कवयित्री आणि समाजसेविका क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले यांची आज १९५वी जयंती. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामधील नायगांवमध्ये झाला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई, तर वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. वयाच्या ९ व्या वर्षी अर्थात १८४० साली महात्मा जोतीराव फुले यांच्याशी विवाह झाला. त्यावेळी जोतीराव फुले हे १३ वर्षांचे होते.आज देशात महिला प्रत्येक क्षेत्रात प्रगती करीत आहेत. त्याचे एकमेव कारण म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले होय. त्यावेळी लोकांचा विरोध असून सुद्धा महिलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांना संघर्षाचा सामना करावा लागला. यामध्ये त्या यशस्वी होऊन महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. त्यांनी 'चूल आणि मूल' या बेडीतून महिलांना मुक्त केले. त्यामुळे आज उच्च पदावर महिला विराजमान झालेल्या दिसत आहेत. आपल्या आयुष्यात महिलांना सुशिक्षित करून त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले. त्या निरक्षर असून सुद्धा प्रथम शिकल्या. त्यांनी न डगमगता आपले ध्येय डोळ्यांसमोर ठेवले. शिक्षणाची ज्योत कायम मनात तेवत ठेवली. त्यामुळे आज अनेक ज्योती निर्माण झाल्या.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पती महात्मा जोतीराव फुले यांच्या मदतीने पुण्यामधील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. त्या शाळेच्या पहिल्या मुख्याध्यापिका त्या आधी पहिल्या शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले झाल्या. या शाळेत नऊ मुली होत्या. क्रांतिवीर लहुजी साळवे यांची पुतणी मुक्ता साळवे या त्यांच्या पहिल्या विद्यार्थीनी. १५ मार्च १८५२ पर्यंत म्हणजे जवळ जवळ चार वर्षांत मुलींसाठी १८ शाळा सुरू केल्या. यामध्ये १८४९ साली मुस्लीम महिलांना आणि लहान मुलांना साक्षर करण्यासाठी पुण्यात उस्मान शेख या मुस्लीम बांधवाच्या घरी शाळा सुरू केली. म्हणजे त्यावेळी महिलांना शिक्षणाची परवानगी नसताना सुद्धा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतीराव फुले या दाम्पत्यांनी केवढे शैक्षणिक महान कार्य केले याचे आत्मपरीक्षण आजच्या महिलांनी करणे गरजेचे आहे. कारण क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी विशेषत: महिलांच्या शिक्षणाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आपल्या आयुष्यात शेवटच्या क्षणापर्यंत शिक्षण क्षेत्रात काम करत राहिल्या. त्यामुळे शिक्षणक्षेत्रातील त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल ब्रिटिश शासनाने १६ नोव्हेंबर १८५२ रोजी त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला. बालहत्या होऊ नये म्हणून त्यांनी २८ जानेवारी १८६३ रोजी आपल्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून प्रसूतिगृहही सुरू केले. त्याची देखरेखीची संपूर्ण जबाबदारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले करीत असत. तसेच १८९६ च्या दुष्काळात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि लोकांचे आर्थिक नुकसान झाले. त्यावेळी त्यांनी शरीरविक्रय करणाऱ्या बायांना आधार देण्यासाठी त्यांना सत्यशोधक कुटुंबाच्या आश्रयास ठेवले.आज शाळांचा विचार केल्यास दिवसेंदिवस शाळेतील मुलींची संख्या वाढत असून उच्च शिक्षणामध्ये सुद्धा मुलींची संख्या मुलांपेक्षा अधिक आहे. आपल्या राज्यात महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या वतीने इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थिनींना आर्थिक सहाय्य म्हणून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती सुरू आहे. तेव्हा या शिष्यवृत्तीचा लाभ महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील मुलींनी घ्यावा. राज्यात अल्पसंख्याक समुदायामध्ये मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन आणि पारशी या समुदायातील मुलींचा समावेश होतो. तेव्हा या शिष्यवृत्तीची कल्पना अजून बऱ्याच मुलींना नाही. त्यामुळे अशा शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागते. १२ जानेवारी १९९६ पासून इयत्ता ५ वी ते ७ वीसाठी आणि इयत्ता ८ वी ते १० वीपर्यंत २५ जुलै, २००३ पासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. तेव्हा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले त्यावेळी म्हणायच्या वेळ विनाकारण व्यर्थ घालवू नका, जा आणि शिक्षण प्राप्त करा! तसेच शिक्षण ही प्रत्येक स्त्रीच्या मुक्ततेची गुरुकिल्ली आहे असे त्यांना वाटायचे. तेव्हा आजच्या विद्यार्थिनींनी त्यांच्या विचारांचा गांभीर्याने विचार करून शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहायला हवे. तरच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केल्याचे फलित होईल. महिलांच्या मुक्तिदाता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन २०२० पासून 'महिला शिक्षण दिन' म्हणून महाराष्ट्रात साजरा करण्यात आला तरी देशात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन 'शिक्षक दिन' म्हणून साजरा होणे गरजेचे आहे.

# जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पत्रकार शेख आयेशा यांचा वाढदिवस साजरा

## सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या पत्रकारितेतील सावित्री म्हणजेच शेख आयेशा मॅडम होय–फौजदार वासुदेव मिसाळ

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारिताक्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक कार्याचा खडतर वसा पत्रकार शेख आयशा मॅडम यांनी घेतला आहे.सातत्याने उपेक्षित, वंचित आणि तृतीयपंथीयांसाठी त्यांचे सुरू असलेले सामाजिक कार्य आदर्शवत असून त्यांनी आपला स्वतःचा वाढदिवस जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात साजरा करून इतरांसमोर एक चांगला आदर्श निर्माण केला आहे असे प्रतिपादन शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे फौजदार वासुदेव मिसाळ यांनी केले. बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे लोकजगतच्या संपादक शेख आयेशा रफिक यांचा वाढदिवस केंद्रातील बेघर लाभार्थ्यांना गोड जेवण देऊन सामाजिक उपक्रमांनी १ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संपादक तथा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह पत्रकार शेख आयुब,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश गंगाधरे, ज्येष्ठ संपादिका प्रतिभा गणोरकर, नयना भाकरे, डॉ. संजय तांदळे, शेतकरी संघटनेचे करपे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार गौतम भालेराव, अफसाना शेख तसेच जिव्हाळा केंद्राचे संचालक



अभिजीत वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे,काळजीवाहक छाया सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी पत्रकार शेख आयेशा रफिक यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केल्याबद्दल कौतुक केले. या कार्यक्रमास जिल्हाभरातून पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पत्रकारांनी जिव्हाळा बेघर केंद्र दत्तक घ्यावे – पत्रकार वैभव स्वामी**

ज्यांना स्वतःच्या हक्काचे छत नाही, रक्ताचे नातेवाईक सांभाळत नाहीत अशा बेघर निराधारांना सांभाळण्याचे त्यांना स्वाभिमानाने जगवण्याचे अवघड काम जिव्हाळा बेघर निवारा केंद्र हे कोणत्याही शासनाच्या अनुदानाशिवाय दानशूर यांच्या मदतीने करत आहेत. हे काम अतिशय अवघड असल्यामुळे त्यांच्या या कार्याला मदत म्हणून बीड शहरासह जिल्ह्यातील पत्रकारांनी आपला स्वतःचा वाढदिवस आपल्या कुटुंबातील वाढदिवस अथवा पुण्यतिथी या ठिकाणी येऊन साजरी करावी.त्याचबरोबर आपले सर्व क्षेत्रात असलेले चांगले संबंध या विधायक कार्यासाठी उपयुक्त करून या निराधारांना दोन वेळचे पोटभर जेवण मिळेल यासाठी सामाजिक दायित्व म्हणून भविष्यात जबाबदारी घ्यावी असे आवाहन करून पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा मॅडम यांनी आपला स्वतःचा वाढदिवस नववर्षाच्या शुभारंभ दिनी या बेघर निवारा केंद्रात करून आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा आदर्श बीड जिल्ह्यातील पत्रकारांनी घ्यावा असे आवाहन याप्रसंगी केले.

**तृतीयपंथी शीतल साठे यांचा देखील वाढदिवस बेघर केंद्रात साजरा**

तृतीयपंथीयांच्या प्रश्नांवर त्यांना न्याय देण्यासाठी निस्वार्थ भावनेने काम करत असलेल्या पत्रकार शेख आयेशा रफिक यांनी आपल्या सोबत या ठिकाणी तृतीयपंथी असलेल्या शितल साठे यांचा देखील वाढदिवस साजरा केला.आणि यापुढे या बेघर निवारा केंद्रात तृतीयपंथी देखील रस्त्यावर निधी मागून या ठिकाणी बेघर निवारा केंद्रातील निराधारांचे पोट भरण्यासाठी आपल्या वाढदिवसा दिवशी जेवण देऊन वाढदिवस साजरा करतील असे शितल साठे यांनी जाहीर करत तृतीयपंथीयांनी देखील पत्रकार वैभव स्वामी यांच्या जाहीर आवाहनानंतर सामाजिक दायित्व स्वीकारून एक आदर्श संकल्प केला.

# स्त्री जन्माचे स्वागत करत नववर्षाची सुरुवात पत्रकारांनी करून संवेदनशील संदेश दिला–डॉ.सतीशकुमार सोळंके

## बीड जिल्हा रुग्णालयात १ तारखेला जन्मलेल्या १६ मुलींना नवीन ड्रेस आणि आईला साडी चोळी भेट देत पत्रकार संघाने स्त्री जन्माचे स्वागत केले–वैभव स्वामी

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कमी होत असलेला मुलींचा जन्मदर लक्षात घेता २०२६ मध्ये मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी पत्रकार संघाच्या वतीने १ जानेवारी रोजी जन्मलेल्या बीड जिल्हा रुग्णालयातील तब्बल १६ मुलींना नवीन ड्रेस आणि त्यांच्या आईंना साडीचोळी भेट देत मिठाई वाटप करून या कन्यांचे स्वागत केले. पत्रकारांनी या संवेदनशील विषयाला प्रत्यक्ष कृती मधून कार्य करत खऱ्या अर्थाने आदर्श संदेश दिला आहे असे मत बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सतीशकुमार सोळंके यांनी व्यक्त केले.

बीड जिल्हा रुग्णालयामध्ये १ जानेवारी रोजी जवळपास ११ मुलींचा जन्म झाला. या मुलींसह दोन तारखेला सकाळी ११ वाजेपर्यंत जन्मलेल्या ५ मुली अशा एकूण १६ मुलींना नवीन ड्रेस, खेळाचे साहित्य आणि त्या जन्मजात मुलींच्या आईला नवीन साडी चोळी भेट देऊन जिल्हा रुग्णालयातील सर्व प्रस्तुतीगृहात मिठाई वाटप करून स्त्री जन्माचे स्वागत करण्यात आले. या सामाजिक



आणि स्तुत्य उपक्रमाला मुख्य आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत तांदळे त्याचबरोबर माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत तसेच पोलीस वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर तसेच समाजसेवक सुशीलकुमार खटोड, पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा,ज्येष्ठ पत्रकार संदीप बेदरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश गंगाधरे, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, राजू वंजारे,सामाजिक कार्यकर्त्या नयना भाकरे यासह प्रस्तुती ग्रहातील वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी, स्टाफ नर्स यासह मान्यवरांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. यावेळी मुलगी झाली म्हणून काही मातांच्या डोळ्यात जे दुःखाचे अश्रू आले होते ते या उपक्रमामुळे आनंदाश्रूमध्ये परिवर्तित झाले अशा भावना मुलींना जन्म दिलेल्या आईसह उपस्थित नातेवाईकांनी व्यक्त करून या उपक्रमाबद्दल आनंद तर व्यक्त केलाच शिवाय आम्ही मुलगी झाली म्हणून आता पश्चाताप करणार नाहीत तर मुलगी हीच खरी संपत्ती आहे म्हणून तिची चांगली जपवणूक करू आणि तिला समाजामध्ये एक चांगली व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी पालक म्हणून आम्ही देखील जबाबदारी स्वीकारत आहोत अशा भावना व्यक्त केल्या. या सत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### चला स्त्री जन्माचे स्वागत करू या–वैभव स्वामी

**बीड जिल्ह्यात मुलींचा जन्मदर कमी आहे.आगामी काळात हा जन्मदर मुलांपेक्षा सुद्धा जास्त झाला पाहिजे. गर्भामध्ये मुलींना मारणे बंद झाले पाहिजे.यासाठी आता पत्रकार संघ केवळ लेखणीतूनच नाही तर प्रत्यक्ष कृतीतून सुद्धा सामाजिक दायित्व म्हणून ही जबाबदारी स्वीकारत आहे. असे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले.**

# सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर येथे बाल आनंद मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये व्यवहार कौशल्य आणि आत्मविश्वास वाढीस लागावा, या उद्देशाने शहरातील सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर येथे नुकताच 'बाल आनंद मेळावा' अत्यंत उत्साहात पार पडला. या मेळाव्याला पालक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या मेळाव्यात शाळेच्या बालचिमुकल्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत विविध स्टॉल्स लावले होते. यामध्ये प्रामुख्याने खाद्यपदार्थ घरगुती पौष्टिक फराळ आणि अल्पोपहार.खेळणी व वस्तू: मुलांनी स्वतः तयार केलेल्या हस्तकला वस्तू आणि खेळणी. इत्यादीची विद्यार्थ्यांनी स्वतः वस्तूंचे दर ठरवून त्यांची विक्री केली.केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष जीवनात व्यवहार कसा करावा, ग्राहकांशी कसे बोलावे आणि हिशोब कसा ठेवावा, या गुणांचा विकास व्हावा हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी अतिशय चपळाईने स्टॉल सांभाळत आपल्या विक्री कौशल्याने सर्वांची मने जिंकली.विद्यामंदिरआपल्या पाल्यांमधील हा उत्साह आणि आत्मविश्वास पाहून पालकांनी शाळेच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. या मेळाव्यामुळे मुलांच्या संवाद कौशल्यात आणि गणिती प्रक्रियेत मोठी सुधारणा झाल्याचे पालकांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उत्तमरावजी पवार, नगरसेवक विनोद म्हणून नगरसेवक भैयासाहेब मोरे नगरसेवक रंजीत बनसोडे नगरसेवक प्रमोद शिंदे यांच्यासह पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ शिक्षण पुरेसे नाही, तर मुलांमध्ये व्यावसायिक दृष्टी आणि व्यवहाराचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या मेळाव्यातून मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली.
– मुख्याध्यापक,सरस्वती प्राथमिक

# मा.आ.भिमराव धोंडे यांच्या हस्ते.डॉ.राजेंद्र सानप यांना २०२५–२६ चा राज्यस्तरीय गंगाई–बाबाजी पुरस्कार प्रदान



**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

प्रति–सामाजिक,राजकीय, ग्रंथालय ,धार्मिक,क्षेत्रात गेल्या ३५वर्षापासुन कार्यरत असलेले ग्रंथालय चळवळीत स्वतःला वाहून घेणारे बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे माजी कोषाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ.राजेंद्र सानप यांना मा.आ. भिमराव धोंडे साहेब यांच्या हस्ते राज्यस्तरीय सन २०२५–२०२६ चा राज्यस्तरीय गंगाई–बाबाजी आदर्श पुरस्कार आष्टी येथे गुरुवारी दि.१ जानेवारी २०२६ रोजी भगवान महाविद्यालय येथे गंगाई बाबाजी उत्सव कार्यक्रमात देण्यात आला .

बीड जिल्हात शासनाच्यागाव तिथे ग्रंथालय!या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारावी यासाठी ३५ वर्षापासुन सक्रीय सहभाग घेणारे सार्व ग्रंथालयाच्या विविध प्रलंबित प्रश्नावर जन आंदोलन करणारे आंदोलक वृत्तपत्रात विविध विषयांवर लेख लिहिणारे २ पुस्तके प्रकाशित असलेले साहित्यिक डॉ.राजेंद्र सानप यांना सन २०२५–२०२६ चा राज्यस्तरीय गंगाई–बाबाजी आदर्श पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या पुरस्कार वितरण कार्यक्रमास माजी मंत्री जेष्ठ नेते शिवाजीराव पंडित,प्रा सुशीलाताई मोराळे,मा आ राजेंद्र जगताप,सौ दमयंतीताई धोंडे, राजेश धोंडे,युवा नेते अजय धोंडे,सुभाषचंद्र सारडा,दिपक घुमरे यांच्या सह असंख्य मान्यवरांची उपस्थिती होती.या पुरस्काराबद्दल डॉ राजेंद्र सानप यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे..

# बोगस बियाणे-कीटकनाशक कंपन्यांवर अंकुश ठेवण्यासाठी नवीन कायदा आणणार-केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान

## महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी ३६७ कोटींचा निधी वितरित

## केंद्रीय कृषीमंत्र्यांनी साधला स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद !

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी केंद्र सरकार लवकरच कडक असा नवीन 'बियाणे – कीटकनाशक कायदा' आणत आहे. निकृष्ट बियाणे किंवा कीटकनाशकांमुळे पीक वाया गेल्यास संबंधित कंपनीकडून शेतकऱ्यांना पूर्ण नुकसानभरपाई दिली जाईल. तसेच, दोषींवर दंडात्मक व फौजदारी कारवाईची तरतूद या कायद्यात करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय कृषी व ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या (ठघतध) २१ व्या हप्त्यापोटी केंद्राने ३६७ कोटी रुपयांचा निधी वितरित केल्याची माहितीही त्यांनी याप्रसंगी दिली.




कृषी विज्ञान केंद्र (पायरेन्स), बाभळेश्वर येथे आयोजित 'शेतकरी संवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, 'अटारी' (पुणे) चे संचालक डॉ. एस. के. रॉय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे व प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. यु. एस. कदम आदी उपस्थित होते.

केंद्रीय कृषीमंत्री श्री. चौहान म्हणाले, शेती क्षेत्रात दरवर्षी नवीन तंत्रज्ञान येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जुनाच अभ्यासक्रम शिकवणे योग्य नाही. भारतीय कृषी संशोधन परिषदेने अभ्यासक्रम बदलासाठी दहा वर्षांची वाट न पाहता, गरजेनुसार त्यात तत्काळ बदल करावेत, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्यासाठी उत्पादनाचे प्रमाणीकरण करणारी स्वतंत्र व विश्वासार्ह यंत्रणा उभारण्यात येईल. यामुळे विषमुक्त शेतमालाला बाजारात दुप्पट भाव मिळणे शक्य होईल, असा विश्वास श्री. चौहान यांनी व्यक्त केला. तसेच, युरिया व खतांच्या तुटवड्याचा गैरफायदा घेऊन काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने ८६२ कोटी रुपयांची मदत दिली आहे. 'थेट लाभ हस्तांतरण' (उ्ढढ) प्रणालीमुळे मदतीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असल्याने मध्यस्थांची साखळी नष्ट झाली आहे. कृषी यांत्रिकीकरण व सूक्ष्म सिंचनाचे अनुदानही विनाविलंब व पारदर्शक पद्धतीने शेतकऱ्यांना मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

जिल्हाधिकाऱ्यांनी पीक नुकसानीचे अचूक पंचनामे करण्याबाबत प्रशासनाला सूचना घ्याव्यात. विमा कंपन्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून द्यावी , असे निर्देश त्यांनी दिले.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्राला २९ लाख घरे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच, नव्याने सर्वेक्षण करून उर्वरित कच्च्या घरांसाठीही पक्के घर उपलब्ध करून देण्यासाठी निधी दिला जाईल. 'लखपती दीदी' अभियानांतर्गत महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी अभ्यासक्रमात आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करा – पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, शेती क्षेत्र वेगाने बदलत असून कृषी विद्यापीठांचे जुने संशोधन व अभ्यासक्रम आता कालबाह्य झाले आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर न बनवता, त्यांना भविष्यातील प्रगत शेतकरी म्हणून घडवण्यासाठी कृषी अभ्यासक्रमात आता 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (-ख), डिजिटल शेती व यांत्रिकीकरणाचा तातडीने समावेश करणे ही काळाची गरज आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेने दरवर्षी अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन नवीन तंत्रज्ञानाचा त्यात समावेश करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया' योजनेत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक पटकावल्याची माहिती पालकमंत्र्यांनी दिली.

यावेळी केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या हस्ते विविध कृषी योजनांतील लाभार्थी व प्रगतीशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये राहता तालुक्यातील प्रमोद रावसाहेब बोटे (शेळीपालन), राजुरी येथील राहुल सुरेश कसाब, दाढ-बुद्रुक येथील नंदिनी विजय गाडेकर व गोगलगाव येथील नैसर्गिक शेती करणाऱ्या मंजुश्री राधाकिसन गुळवे यांचा गौरव करण्यात आला.तसेच, 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत' मयत शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपयांचे धनादेश सुपूर्द करण्यात आले. 'विकसित भारत – जी. रामजी योजने'अंतर्गत फळबाग लागवडीसाठी निवडक शेतकऱ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले.तत्पूर्वी, 'राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत' शेतकऱ्यांना यंत्रे व अवजारे वितरित करण्यात आली. तसेच महिला व शेतकरी गटांच्या दालनांना केंद्रीय कृषीमंत्र्यांनी भेट देत संवाद साधला.

# शेतकरी-कामगारांच्या हक्कांसाठी राज्यव्यापी दिशा ठरवणारी बैठक

## शेतकरी जनहित कामगार मंचची ७ जानेवारीला बीड येथे भव्यराज्यस्तरीय बैठक

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी व कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या शेतकरी जनहित कामगार मंच,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने येत्या बुधवार दि.७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२-३० वाजता बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे भव्य राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे.या महत्त्वपूर्ण बैठकीत राज्यभरातील पदाधिकारी,कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून शेतकरी-कामगारांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर सखोल चर्चा होणार आहे.

या राज्यस्तरीय बैठकीस महाराष्ट्र अध्यक्ष जयवंतराव कांबळे, महाराष्ट्र सचिव दीपक गायकवाड,ठाणे जिल्हा अध्यक्ष संदीप पगारे तसेच मुंबई उपाध्यक्ष नयन कदम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. बैठकीचे अध्यक्षस्थान बीड जिल्हा समन्वयक पांडुरंग कसबे भूषविणार असून स्वागताध्यक्ष म्हणून बीड जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव यांची प्रमुख भूमिका असणार आहे.या बैठकीस प्रदेशाध्यक्ष श्रीमतीसोळंके यांच्यासह नाशिक जिल्हा अध्यक्ष संतोष कटाळे, लातूर जिल्हा अध्यक्ष प्रदीप वाघचौरे,पुणेजिल्हा अध्यक्ष अमर कांबळे, धाराशिव जिल्हा अध्यक्ष पियुष सावंत,सातारा जिल्हाध्यक्ष सागर घाडगे, जालना जिल्हा अध्यक्ष आशिष गवळी यांच्यासह राज्यभरातीलजिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.बीड जिल्हा उपाध्यक्ष अतिक सय्यद यांचीही या बैठकीत महत्त्वपूर्ण उपस्थिती राहणार आहे.राज्यातील शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण,शेतमाला ला मिळणारा कमी दर, अपूर्ण रस्ते व विकास कामे, कामगारांचे प्रश्न, बेरोजगारी,सामाजिक न्याय तसेच संघटनेची पुढील दिशा व आंदोलनात्मक भूमिका यावर या बैठकीत सखोल चर्चा करून ठोस निर्णय घेतले जाणार आहेत. राज्यातील शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांसाठी एकत्रित लढा उभारण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात येणार आहे.या राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन राहुल दळवी,राहुल रोकडे, शिवाजी राठोड,इंद्रजीत डोंगरे,बाबुराव डोंगरे, प्रतीक वाघमारे,अरबाज शेख,तुकाराम गालफाडे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे. शेतकरी व कामगार हिताच्या लढ्याला नवी दिशा देणाऱ्या या ऐतिहासिक राज्यस्तरीय बैठकीस राज्यभरातील पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी जनहित कामगार मंचच्या वतीने करण्यात आले आहे.

## बिसेफ व लहुजी क्रांती मोर्चाचे मार्गदर्शक माजी मुख्याध्यापक मदन जोगदंड सरांचा ५९ वा वाढदिवस उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बिसेफ संघटनेचे राज्य पदाधिकारी,लहुजी क्रांती मोर्चाचे मार्गदर्शक तसेच माजी मुख्याध्यापक श्री. मदन जोगदंड सर यांचा ५९ वा वाढदिवस सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. समाजप्रबोधन,शिक्षण आणि परिवर्तनवादी चळवळीतील त्यांचे योगदान यावेळी उपस्थितांनी गौरवपूर्वक अधोरेखित केले.



कार्यक्रमात बाबुराव गालफाडे सर,विठ्ठल जाधव सर,वैजनाथ क्षीरसागर,शहाजी जाधव सर,मनोहर गालफाडे सर, धनराज सोनवणे साहेब, अर्जुन रोडे सर,संजय कुमार देशपांडे साहेब, बाळासाहेब लोखंडे सर, सारुक सर,रघुनाथ शिंदे सर यांच्यासह अनेक मान्यवर व सहकारी उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी मदन जोगदंड सर यांच्या शैक्षणिक सेवाकार्याचा, सामाजिक बांधिलकीचा तसेच बिसेफ व लहुजी क्रांती मोर्चामधील मार्गदर्शक भूमिकेचा गौरव केला.विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत,सामाजिक समतेच्या विचारांच्या प्रसारात आणि परिवर्तन वादी चळवळीला बळ देण्यात त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

वाढदिवसा निमित्त उपस्थितांनी त्यांना दीर्घायुष्य,उत्तम आरोग्य व समाज कार्यातील सातत्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रम सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडला.

## ज्येष्ठ शिक्षक श्री.नवनाथ पाळवदे यांचा सेवापुर्ती निमित्त संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्या कडून गौरवपूर्ण सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

श्याम विद्यालय दहिफळ वडमाऊली,तालुका केज येथील ज्येष्ठ व आदर्श शिक्षक श्री.नवनाथ पाळवदे यांनी आपल्या प्रदीर्घ आणि सेवाभावी शैक्षणिक कारकिर्दीची यशस्वीपणे पूर्तता केल्या बद्दल हॉटेल गोल्डन चॉईस बीड येथे त्यांच्या सेवापुर्ती निमित्त भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या समारंभातशिक्षण क्षेत्रातील मान्यवर,संस्था पदाधिकारी,शिक्षक, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडमाऊली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.शशिकांत दहिफळकर होते.तर प्रमुख उपस्थितीत संस्थेचे सचिव शरद गदळे,डॉ. अनंत मुळे,श्याम विद्यालयाच्या प्राचार्या सौ.जयश्री शरद गदळे, श्रीमती मनीषाताई तोकले,बप्पासाहेब घुगे, मुरली बप्पा ढाकणे,श्री. अशोक भाऊ तांगडे,माजी सरपंच तात्यासाहेब डोईफोडे,संकेत पाळवदे यांच्यासह अनेक




मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना मान्यवरांनी श्री. नवनाथ पाळवदे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला.शिस्तप्रिय, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारे, अध्यापनात सातत्य व प्रामाणिकपणा जपणारे शिक्षक म्हणून त्यांनी श्याम विद्यालयात एक आदर्श निर्माण केला. असल्याचे मत वक्त्यांनी व्यक्त केले.अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले असून त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील, असे गौरवोद्गार काढण्यात आले.सत्काराला उत्तर देताना श्री.नवनाथ पाळवदे यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला.शाळा,संस्था, सहकारी शिक्षक,विद्यार्थी व पालकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असून भावी पिढी घडवण्याची जबाबदारी शिक्षकांवर असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. मान्यवरांचे स्वागत, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले.या सत्कार समारंभामुळे श्री.नवनाथ पाळवदे यांच्या दीर्घ व समर्पित सेवेला एक सन्माननीय आणि भावनिक निरोप देण्यात आला.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शिक्षणाची भक्कम पायाभरणी; टाकवहाळ आश्रमशाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

दैनिक वादळ वार्ता
**पालघर । प्रतिनिधी**

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दर्जेदार व स्पर्धात्मक शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित करत टाकवहाळ (मनोर) येथील शासकीय आश्रमशाळेत शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. पालघर शिवसेना जिल्हा प्रमुख वसंत चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमामुळे शिक्षण क्षेत्रात सकारात्मक संदेश गेला.



या कार्यक्रमाला बोईसर विधानसभा आमदार विलास तरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून, योग्य संधी मिळाल्यास आदिवासी विद्यार्थी प्रशासन, वैद्यकीय, अभियांत्रिकीसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, अशी भूमिका कार्यक्रमातून मांडण्यात आली.

वाढदिवस साजरा करण्याऐवजी समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा जपत वसंत चव्हाण यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षणाबाबत नवी उमेद निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.कार्यक्रमास माजी आमदार अमित घोडा, शिवसेना उपजिल्हा प्रमुख दिवाकर सिंग, धनंजय मोहिते, किरण पाटील, जयवंत गुरोडा, माजी पंचायत सभापती राजना म्हसकर, उपसरपंच तनुजा घरात, नाना सांबरे, गणेश घोलप यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शिक्षणातील सातत्य, परिश्रम आणि स्वप्नपूर्तीचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. समाज, संघटना आणि शासन यांच्या समन्वयातून आदिवासी विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक सक्षम आणि उज्वल घडू शकते, असा सकारात्मक आशय या उपक्रमातून पुढे आला.

# ठाण्यात मनसे अन् ठाकरे गटाला धक्का, दोन उमेदवारांचे अर्ज बाद

## अविनाश जाधवांनी घेतला मोठा निर्णय; निवडणूक अधिकाऱ्यांचे टेन्शन वाढणार!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिका निवडणुकीत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मनसे आणि शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. उमेदवारी अर्जांच्या छाननीदरम्यान ठाकरे गट आणि मनसेच्या एका उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला आहे.

ठाण्यातील प्रभाग क्रमांक १७ मधून शिंदे गटाचे मनोज शिंदे यांच्याविरोधात रिंगणात असलेल्या ठाकरे गटाच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला आहे. या उमेदवाराने याबाबत संशय व्यक्त करताना निवडणूक आयोगावर आरोप केले आहेत. माझा उमेदवारी अर्ज छाननीवेळी बाद ठरवण्यात आला. मी सही केली नाही आणि बँकेचे स्टेटमेंट न दिल्याचे कारण सांगत माझा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला. माझा फॉर्म अवैध ठरवल्यानंतर मला निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं नाही की, तू पुन्हा एकदा नवीन प्रतिज्ञापत्र घेऊन ये. मी सकाळी आरओकडे आलो त्यावेळी त्याने मला काही सांगितले नाही. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपायला १० मिनिटं असताना मला नवीन प्रतिज्ञापत्र घेऊन यायला सांगितले. मी गरीब घराचा मुलगा आहे, त्यामुळे माझ्याबरोबर अन्याय करण्यात आला. माझ्यासमोर शिंदे गटाचे मनोज शिंदे हे निवडणूक लढवत आहेत. त्यांनी तरी कुठे निवडणूक अधिकाऱ्यांना सांगितलं तर नाही ना, असा संशय ठाकरे गटाच्या उमेदवाराने बोलून दाखवला.

तर दुसरीकडे ठाण्यातील प्रभाग क्रमांक १८ मधील मनसेचे उमेदवार प्राची घाडगे यांचा उमेदवारी अर्जही बाद ठरवण्यात आला आहे. उमेदवारी अर्ज भरायची मुदत संपायला अवघी काही मिनिटे शिल्लक असताना मला कागदपत्रं राहिल्याचे सांगण्यात आले. ती कागदपत्रं वेळेत देऊनही पोलिसांनी आम्हाला आत सोडण्यास नकार दिला. काहीवेळाने पोलिसांनी आम्हाला आतमध्ये सोडले तेव्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी आमचं काहीही ऐकून न घेता उमेदवारी अर्जाची छाननी केली आणि कागदपत्र नसल्याचे कारण देत आमचा अर्ज अवैध ठरवला. जेव्हा आम्ही यावर हरकत घेतली तेव्हा आम्हाला तुम्ही वेळेत न आल्याचं कारण सांगण्यात आले, असे मनसेच्या प्राची घाडगे यांनी सांगितले.

मनसेच्या प्राची घाडगे यांचा उमेदवारी अर्ज बाद ठरवल्याबद्दल मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी संताप व्यक्त केला. प्राची घाडगे यांनी त्यांची चूक मान्य केली होती. निवडणूक अधिकाऱ्यांनी ज्यावेळी उमेदवार फॉर्म भरतो, त्याचा डिस्प्ले करावा लागतो, त्यानंतर छाननी प्रक्रिया सुरु होते. निवडणूक अधिकारी वैशाली मॅडम यांना ११ वाजता फॉर्म डिस्प्ले करायला पाहिजे होता. परंतु त्यांनी साडेतीन वाजता फॉर्म डिस्प्ले केला आणि तिकडेच त्यांनी निवडणूक आयोगाच्या नियमाचे उल्लंघन केले. आम्ही प्रतिज्ञापत्र लावायला विसरलो ते आम्ही नंतर आणून जमा केले. निवडणूक अधिकाऱ्यांची मुलगी दुपारी फाईल घेऊन आली होती. ज्यावेळी आम्ही त्यांना विचारलो की कुठली फाईल होती, त्यावर मॅडमनी सांगितले की, डिप्रेशनच्या औषधाची फाईल होती तर आम्ही म्हणालो की, ही फाईल तुम्ही whatsapp वरती देखील मागू शकला असता. काही दिवसांपूर्वी आम्ही ठाण्यामध्ये आंदोलन केले होते आणि निवडणूक अधिकारी हा भ्रष्ट नसावा, अशी आम्ही मागणी केली होती आणि जाणून-बुजून ROने आमच्या उमेदवारांचा फॉर्म अवैध केलेला आहे, असा आरोप अविनाश जाधव यांनी केला.

# वैजनाथ आबा कराड यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ संपन्न मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील वित्त व लेखा विभागाचे व्यवस्थापक वैजनाथ रघुनाथ कराड व मानव संसाधन विभागातील शिपाई श्रीमती सुनिता विलासराव होळकर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांना ३१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात आयोजित सेवापूर्ती कार्यक्रमात भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते त्यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला.
वैजनाथ आबा कराड हे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. सामाजिक कार्यकर्ते, उत्कृष्ट प्रशासक, आणि प्रभावी नेतृत्व गुण असणारे कराड साहेब आपल्या सहकाऱ्यांना नेहमीच मार्गदर्शन आणि मदत करण्यासाठी तत्पर असतात. त्यांनी आपल्या कारकिर्दीत शिक्षक, प्राध्यापक, नगरसेवक, कर्मचारी, कामगार नेते, पतसंस्थेचे संचालक, खेळाडू आणि उत्कृष्ट सल्लागार अशा विविध भूमिका अत्यंत समर्थपणे पार पाडल्या आहेत.
या प्रसंगी प्रभारी उप मुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता एस. ए. सनाके, प्रभारी अधीक्षक अभियंता सुरेश गर्जे, भीमराव शिरसाट, साहेबराव चव्हाण, वित्त व लेखा विभागाचे व्यवस्थापक एस. बी. डोंगरे व एम. एन. जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच कामगार नेते हरिराम गित्ते, मानव संसाधन विभागाचे श्रीगणेश मुंडे, व्यवस्थापक सुनील पवार, श्रीनिवास गित्ते, अरुण गित्ते, वैजनाथ चाटे, जोशी, राजा घुले, सूर्यवंशी, राठोड, बालाजी पवार, रमण मिठके, गणपत कराड, रामधन कराड, संजीवनी मुंडे, दीपक कराड, अशोक कराड, अरुण कराड, भगवान साकसमुद्रे आदी मान्यवर आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या सुरुवातीस सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा घेणारी एक विशेष चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.



# शौर्य दिना निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

भीमा कोरेगाव येथील २०८ च्या शौर्य दिनाच्या निमित्ताने साळेगाव येथील भीम अनुयायांनी रक्तदान करून ५०० योद्यांना अभिवादन केले.
सन १८१८ साली भीमा कोरेगाव येथील झालेल्या ऐतिहासिक लढाईत पेशव्यांच्या ५०० शूरवीरांनी २८ हजार शत्रू सैनिकांना नामोहरम केले होते. त्या निमित्त १ जानेवारी या दिवशी त्या शूरविरांना अभिवादन करण्यासाठी २०८ शौर्यदिन साळेगाव तालुका केज येथे साजरा करण्यात आला. या निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून भीमा कोरेगाव येथील ५०० शूरवीरांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अशोक गिते, रामेश्वर शिंदे, संभु सरवदे, ज्योतिराम बचुटे, अविनाश सरवदे, रोशन सरवदे, अमोल



जगताप, अशोक रोडगे, अशोक राऊत, पप्पू पठाण, निलेश इंगळे, इरफान सय्यद, पप्पू पठाण हे उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी रोशन सरवदे, विशाल बचुटे, अमित बचुटे, मोहित बचुटे, रोशन सरवदे, विशाल बचुटे, अमित बचुटे यांनी परिश्रम घेतले.

# निसर्गाची किमया! तळोदा–बोरद मार्गावर अवतरला हिरवा नंदनवन; प्रवाशांची पावले खिळताहेत या अर्ध्या एकरात

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

माणूस जेव्हा निसर्गाच्या सानिध्यात जातो, तेव्हा त्याचे मन प्रसन्न होतेच, पण निसर्ग जेव्हा स्वतःचे सौंदर्य लेवून एखाद्या छोट्याशा जमिनीच्या तुकड्यावर अवतरतो, तेव्हा तो प्रत्येकाचे लक्ष वेधून घेतो. असाच काहीसा अनुभव सध्या तळोदा ते बोरद दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना येत आहे. मोड गावाजवळ असलेल्या अवघ्या अर्ध्या एकराच्या क्षेत्राने सध्या आपल्या अफाट सौंदर्याने सर्वांना भुरळ घातली आहे. या छोट्याशा भूखंडात निसर्ग आणि मानवी कष्टाचा सुरेख संगम पाहायला मिळतो. या क्षेत्रात जवळपास २० ते २५ आंब्याची डौलदार झाडे डोलत असून, त्यांच्याच सावलीत गव्हाची पेरणी करण्यात आली आहे. एका बाजूला फळांचा राजा मानल्या जाणाऱ्या आंब्याची कोवळी झाडे आणि दुसऱ्या बाजूला जमिनीवर पसरलेला गव्हाचा हिरवागार शालू, असे हे दृश्य जणू एखाद्या जिवंत चित्रासारखे भासते.
सकाळच्या प्रहरी निसर्गाचे हे रूप अधिकच खुलून दिसते. सूर्य जेव्हा उत्तर दिशेला आपले तोंड वळतो, तेव्हा त्याची कोवळी सुवर्णकिरणे थेट गव्हाच्या पिकावर आणि आंब्याच्या पानांवर पडतात. या प्रकाशामुळे गहू आणि आंब्याची झाडे चकाकू लागतात. पानांवर साचलेले दवबिंदू हिऱ्याप्रमाणे चमकतात, ज्यामुळे या संपूर्ण क्षेत्राला एक वेगळीच झळाळी




प्राप्त होते. निसर्गाचा हा 'गोल्डन अवर' पाहण्यासाठी प्रवाशांची नजर नकळत त्या शेताकडे वळते.
रस्त्याने येणाऱ्या–जाणाऱ्या प्रवाशांना या हिरवळीचा मोह आवरत नाही. गाडीच्या वेगापेक्षा या निसर्गसौंदर्याची ओढ जास्त प्रभावी ठरत आहे. या ठिकाणी किमान पाच मिनिटे तरी शांत बसावे, अशी भावना प्रत्येक प्रवाशाच्या मनात निर्माण होत आहे. ही हिरवळ केवळ डोळ्यांना थंडावा देत नाही, तर मनातील थकवा दूर करून एक नवी ऊर्जा प्रदान करते.
थोडक्यात सांगायचे तर...हे अर्ध्या एकराचे क्षेत्र म्हणजे 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' या उक्तीचे जिवंत उदाहरण आहे. धावपळीच्या जीवनात निसर्गाशी नाते जोडणारे हे छोटेसे नंदनवन सध्या या मार्गावरील आकर्षणाचे मुख्य केंद्र ठरले आहे.

# मुकदम (चव्हाण) व चिखलीकर कुटुंबांचे पिढीजात जिव्हाळ्याचे नाते–आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा–कंधार तालुक्यातील ग्रामीण विकासात कंधार व लोहा पंचायत समितीचे माजी सभापती कै. व्यंकटराव मुकदम यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. तसेच लोहा नगरपालिकेच्या थेट जनतेतून निवडून आलेल्या पहिल्या नगराध्यक्षा स्व. जिजाबाई मुकदम यांच्या कार्यकाळात शहरात अनेक विकासकामे झाली. नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली शहरात आणखी चांगली कामे होतील, असा विश्वास आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला .स्व. जिजाबाई मुकदम यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी मुकदम (चव्हाण) परिवार व चिखलीकर कुटुंब



यांच्यात अनेक पिढ्यांपासून असलेल्या कुटुंबिक व जिव्हाळ्याच्या नात्यांना उजाळा दिला .या कार्यक्रमास व्यासपीठावर माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर,ड. मुक्तेश्वर धोंडगे,नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांच्यासह सर्व नगरसेवक व मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माणिकराव मुकदम यांनी केले.नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांनी आपल्या मनोगतात शहर विकासाविषयी विचार मांडले.सदील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम कदम यांनी केले, तर आभारप्रदर्शन बिपिन चव्हाण यांनी केले.

# बेकायदेशीर सांस्कृतिक कला केंद्रांचा कारभार उघड

## जामखेड तालुक्यात तात्काळ कारवाईची मागणी–प्रशासन झोपेत की संगनमतात?

दैनिक वादळ वार्ता
**अहील्यानगर । प्रतिनिधी**

जामखेड तालुक्यात तथाकथित सांस्कृतिक कला केंद्र या नावाखाली सुरू असलेला बेकायदेशीर आणि अनैतिक व्यवसाय आता चव्हाट्यावर आला आहे. कला, संस्कृती आणि परंपरेच्या नावाखाली तरुण पिढीची दिशाभूल करत मुलींच्या आयुष्याशी खेळण्याचा घाणेरडा उद्योग खुलेआम सुरू असल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत.
परवाने नसताना, नियमांचे सर्रास उल्लंघन करत अनेक कला केंद्रे रात्रंदिवस सुरू आहेत. काही केंद्रांमध्ये अल्पवयीन मुलींचा वापर केला जात असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत असूनही प्रशासन अद्याप मूकदर्शकाची भूमिका घेत आहे, ही बाब अत्यंत संतापजनक आहे.
प्रश्न असा आहे की – हे सगळे सुरू असताना जबाबदार अधिकारी नेमके काय करत आहेत? हप्तेखोरीमुळेच ही केंद्रे निर्धास्तपणे सुरू आहेत का? स्थानिक तरुण वर्ग व्यसनाधीनतेकडे, गुन्हेगारीकडे वळत असताना समाजाचा कणा मोडला जात आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा बोजवारा उडवणाऱ्या या केंद्रांवर तात्काळ टाळे ठोकले पाहिजे, अन्यथा प्रशासनाचा निष्क्रियपणा इतिहास कधीही माफ करणार नाही. दलित पँथर संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, जर तात्काळ कारवाई झाली नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन, तसेच मंत्र्यांच्या दालनापर्यंत संघर्ष नेण्यात येईल. आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.आता तरी प्रशासन जागे होणार का? की जनतेच्या रस्त्यावर उतरल्यावरच हालचाल होणार? जामखेड तालुक्यातील जनता उत्तर मागत आहे – कायदा सर्वांसाठी समान आहे की फक्त कागदावरच?

# विघ्नहर्ता मित्र मंडळाची सामाजिक कार्यातून गरुडझेप

## 'गणराया अवॉर्ड २०२५' मध्ये प्रथम क्रमांकाचा मान



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड पोलिस विभाग आयोजित 'गणराया अवॉर्ड २०२५' स्पर्धेत विघ्नहर्ता मित्र मंडळाने प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्यात आपली स्वतंत्र व आदर्श ओळख निर्माण केली आहे. सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, गरजूंसाठी दिलेला मदतीचा हात तसेच शिस्तबद्ध व अद्वितीय गणेश विसर्जन मिरवणूक यामुळे मंडळाला हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.
हा सन्मान जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. पूजा पवार आणि पोलीस निरीक्षक श्री. शीतल कुमार बल्लाळ यांच्या हस्ते मंडळाला सन्मानचिन्ह प्रदान करून देण्यात आला.विघ्नहर्ता मित्र मंडळाने वर्षभर राबवलेले सामाजिक उपक्रम, स्वच्छता अभियान, सामाजिक व सांस्कृतिक जनजागृती कार्यक्रम आणि भाविकांच्या सहभागातून साकारलेली शिस्तबद्ध गणेशोत्सव परंपरा हीच या यशाची खरी ताकद ठरली. विघ्नहर्त्याच्या कृपेने आणि भाविकांच्या प्रेमामुळे हा सन्मान मिळाल्याची भावना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.
हा पुरस्कार मंडळाचा नसून जनतेने दाखवलेल्या विश्वासाचा असल्याचे सांगत, विघ्नहर्ता मित्र मंडळाने २०२६ साठीही नव्या उपक्रमांसह, अधिक जोमाने आणि समाजोपयोगी कार्य करत पुढील वाटचाल करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल भाविकांतून सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे.

# बाबासाहेबांच्या प्रतिमेचा अपमान बर्दाश्त नाही ग्वालियर घटनेच्या आरोपींना फाशी द्या देशद्रोह व यूएपीए लावा

## पँथर सेनेची केंद्र–मध्यप्रदेश सरकारला कठोर कारवाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

मध्यप्रदेशातील ग्वालियर येथे संविधान निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोची समाजकंटकांनी जाळल्याच्या निषेधार्ह घटनेने देशभर संतापाची लाट उसळली आहे. या देशद्रोही कृत्याला ऑल इंडिया पँथर सेनेने संविधान व लोकशाहीविरोधी षडयंत्र ठरवत, आरोपींवर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा, यूएपीए लावून आजीवन कारावास किंवा कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.सेनेच्या वतीने आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांना मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव आणि गृहमंत्री



यांना उद्देशून तीव्र शब्दांत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात आरोपी मिश्रा व इतरांना आतंकी घोषित करून यूएपीए अंतर्गत जेलमध्ये टाकणे, देशद्रोहाचा कलम १२४ए लावणे, आजीवन कारावासाची शिक्षा देणे आणि अशा देशविरोधी प्रवृत्तींना कायमची आळा घालण्यासाठी कठोर कायदे व यंत्रणा मजबूत करण्याची आक्रमक मागणी करण्यात आली आहे. व आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर समाजकंटकांचे फोटो जाळून निषेध व्यक्त केला व निवेदन सादर केले , यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी संतप्तपणे म्हटले की, बाबासाहेबांचा अपमान म्हणजे संविधानाचा अपमान, देशाचा अपमान आहे! ही जातीय अत्याचाराची घटना नाही तर थेट देशद्रोह आहे. अशा समाजद्रोही प्रवृत्तींना जर आज जेलमध्ये सडवले नाही, तर भविष्यात संविधान आणि लोकशाहीला मोठा धोका निर्माण होईल. सरकारने तात्काळ कठोर कारवाई करावी, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले जाईल.या वेळी सुंदर वाघमारे, सूर्यकांत ठोकळ, सम्यक कोरडे, राजेश वाडमारे, शिवराम ठाकरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.ऑल इंडिया पँथर सेनेने या देशद्रोही घटनेची अत्यंत गांभीर्याने दखल घेऊन केंद्र व मध्यप्रदेश सरकारला इशारा दिला आहे की, संविधानाच्या रक्षणासाठी आणि दलित–आदिवासी समाजाच्या न्यायासाठी तात्काळ पावले उचलली नाहीत तर देशव्यापी आंदोलन उभे केले जाईल.

# नांदेड येथे श्री नंदकुमार गादेवार यांच्या ६१वा अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अधिवेशन महासभेचे अध्यक्ष तथा समाजभूषण आनंदकुमार गादेवार यांच्या ६१ व्या अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या थाटामाटात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित केला जाणार आहे. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष तथा समाज भूषण नंदकुमार गादेवार यांच्या एकसष्टी निमित्त अभिष्टचिंतन सोहळा आयोजित केला असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्याचे माजी अर्थमंत्री तथा वनमंत्री आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार विशेष उपस्थिती ह भ प एकनाथ महाराज साधू व ज्ञानेश्वर महाराज साधू तर प्रमुख पाहुणे आमदार समीर भाऊ कुणावर हिंगणघाट. सौ सपना ताई सुधीर मुनगंटीवार. भावनासी श्रीनिवास अध्यक्ष काशी अन्नपूर्णा सत्रम. विलास सर बच्चू महासचिव काशी अन्नपूर्ण सत्रम. एलरी लक्ष्ममैया वासवी सत्र समुदाय तिरुपती. यांच्या सहप्रमुख मान्यवर पदाधिकारी व समाज बांधवांच्या उपस्थितीत. दिनांक ४ जानेवारी रविवार रोजी सायंकाळी पाच वाजता रोड नांदेड या ठिकाणी आयोजित केला असून सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077